## प्रसिद्धिपत्रक

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६**
**फोन नं. ०२०-२६६८५०००**

जा.क्र./पोउआ/वाह/ १३०५ /२०२५ पुणे दिनांक - १५/ ०२ /२०२५

पुणे शहरातील हडपसर वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, हडपसर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

### हडपसर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत

- **मगरपट्टा सिटी पोलीस चौकी समोरुन आलेली वाहने मुख्य रस्त्यावर (मगरपट्टा खराडी )डावीकडे वळून १५० मीटर अंतरावरील कै.मोहन धारिया उद्यानासमोरील पंक्चर मधुन यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.**

- **रासकर चौकाकडुन येवून सिझन मॉल/मगरपट्टा सिटी पोलीस चौकी समोरील जंक्शनचे पंक्चर येथे उजव्या बाजुस वळून मगरपट्टा सिटी चौकीकडे जाणा-या वाहनांनी अमनोरा मॉल सिग्नल मधुन यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.**

- **अमनोरा मॉल मधुन बाहेर येवून उजव्या बाजुस वळणारे वाहनांनी डाव्या बाजुस वळावे व पुढील पिझ्झा हट्ट दुकाना समोरील पंक्चर मधुन यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ ऐअरपोर्ट रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक –१५/२/२०२५ ते दिनांक –01/03/२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर.)

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २)**सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – १,२,३,४,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी हडपसर** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

५) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

६) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.